# <u>मुक्ती</u>

झाले सद्गुरू दयावंत
दिधला मंत्र पांडुरंग
घेतले नाम पांडुरंग
रंगले माझे अंतरंग ||१||

घडला नित्य संतसंग
राहिले मन नामी दंग
झडला भ्रम भय भंग
संपले विमोह सवंग ||२||

उपजली मनात भक्ती
निपजली हृदयी शांती
जडली सर्वांभूती प्रीती
भासे जिवंतपणी मुक्ती ||३||

– नारायण
१०/०३/२३